पोलीस अधीक्षक कार्यालय,
सातारा
शिरवळ पोलीस ठाणे

दुरध्वनी क्रमांक :- ०२१६९-२४४१३३

वेबसाईट - www.satarapolice.gov.in
ई-मेल :- shirvalps.satara@mahapolice.gov.in

प्रेसनोट                                दिनांक - २७/०३/२०२६.

**-: मोटार सायकल चोरणारे गुन्हेगारांना अटक करून तिन मोटार सायकली केले हस्तगत :-**

**-: हद्दपार ईसम पोलीस ठाणे हद्दीत विनापरवाना मिळून आल्याने पोलीसांनी केली कारवाई:-**

सातारा जिल्हयातील शिरवळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक - २६/०३/२०२६ रोजी तिन मोटार सायकल चोरीचे तिन गुन्हे दाखल होताच मा. पोलीस अधिक्षक, मा. अप्पर पोलीस अधिक्षक, मा. उपविभागिय पोलीस अधिकारी व पोलीस प्रभारी अधिकारी यांच्या सुचना व मागदर्शनाखाली वेगवेगळी पोलीस पथके तयार करून आरोपीचा व मोटार सायकल शोध घेण्यास त्यांना रवाना केले. पोलीस पथकाने आरोपींचा व मोटार सायकलचा कसुन शोध घेतला असता आरोपी मिळून आले. त्यांच्याकडे केलेल्या कौशल्यपुर्ण तपासात तिनही गुन्हयातील मोटार सायकली हस्तगत करण्यात आलेल्या आहेत. मोटार सायकल चोरीमध्ये एक आरोपी व एक विधिसंघर्षग्रस्त बालक याचा सहभाग निष्पण्ण झालेला आहे. यातील मुख्य आरोपी कालीदास अरविंद जाधव, वय - २१ वर्षे, राहणार - पांडे, तालुका व जिल्हा - पुणे हा असुन त्यास अटक करण्यात आलेली आहे. सध्या तो दिनांक - ३०/०३/२०२६ रोजीपर्यंत शिरवळ पोलीस ठाणे कोठडीत आहे. मुख्य आरोपीचा साथीदार विधिसंघर्षग्रस्त बालकांवर देखील करावाई करण्यात आलेली आहे. शिरवळ पोलीस ठाण्यातील अपराध क्रमांक - १०१/२६, १०३/२६ व १०४/२६, कलम ३०३(२) भारतीय नागरिक संहीता - २०२३ चे गुन्हे उघडकीस आलेला आहेत. पुढील तपास सुरू आहे.

तसेच मा. वरिष्ठांनी वेळोवेळी तडीपार आरोपींवर करावायाच्या कारवाईबाबत दिलेल्या सुचनांप्रमाणे दिनांक - २६/०३/२०२६ रोजी सायंकाळी १९:३० वाजताचे सुमारास सातारा जिल्हयातील खंडाळा तालुक्यामधील मौजे भोळी येथे सातारा, पुणे व सोलापूर जिल्हयातून दोन वर्षाकरीता हद्दपार केलेला ईसम नामे विशाल उर्फ बाबु महादेव चव्हाण, वय - ३० वर्षे, राहणार - भोळी, तालुका - खंडाळा, जिल्हा - सातारा हा शिरवळ पोलीस ठाणे हद्दीत विनापरवाना मिळून आल्याने त्याचेवर महाराष्ट्र पोलीस अधिनियान्वये कारवाई करण्यात आलेली आहे. तरी सर्व नागरीकांना आवाहन करणेत येते की हददपार इसमांनी सातारा, पुणे व सोलापूर जिल्हयात प्रवेश केल्यास त्याची माहिती तात्कळ जवळचे पोलीस ठाणेस देण्यात यावी. माहीती देणारे बातमीधारकाचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल.

सदरची कारवाई मा. श्री. तुषार दोशी, पोलीस अधीक्षक, सातारा, श्रीमती वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक, सातारा, श्री. विशाल खांबे, उपविभागीय पोलीस अधिकारी, फलटण भाग, फलटण व श्री. यशवंत नलवडे, पोलीस निरीक्षक, शिरवळ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शानाखाली सहाय्यक पोलीस निरिक्षक महादेव शिद, पोलीस उप निरिक्षक सतिश आंदेलवार आणि शंकर पांगारे, सहाय्यक पोलीस उप निरिक्षक विलास यादव, पोलीस हवालदार १३०६/गिरिश भोईटे, पोलीस हवालदार १०५१/तुषार कुंभार, पोलीस हवालदार ०९/सचिन विर, पोलीस हवालदार ७८/अजय झुंझार, पोलीस नाईक २३३२/शिवशंकर शेळके, पोलीस शिपाई ९६६/अक्षय बगाड, पोलीस शिपाई ६४६/दिपक पालेपवाड, पोलीस शिपाई २६०९/अरविंद बाऱ्हाळे, पोलीस शिपाई ११७२/भाऊसाहेब दिघे व पोलीस शिपाई ३२५/अक्षय नेवसे यांनी केलेली आहे.

(तुषार दोशी),
पोलीस अधिक्षक, सातारा

प्रति,
मा. संपादक/पत्रकार
सदरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये प्रसिध्द करण्यास विनंती आहे.